15 APR 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणतज्ज्ञांचे महर्षी

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांचे गौरवोद्‌गार : रयत शिक्षण संस्थेला 'प्राचार्य आर.के.कणबरकर' पुरस्कार प्रदान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कोणताही शिक्षणग्रंथ न वाचता शिक्षण क्षेत्रात नवीन प्रयोगांची नांदी घडविणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षणतज्ज्ञांचे महर्षी होते, तर रयत शिक्षण संस्था ही त्यांच्या यशस्वी प्रयोगांची प्रयोगशाळा ठरली, असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ विचारवंत तथा रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एन.डी. पाटील यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठातर्फे कणबरकर प्रथम स्मृतीप्रित्यर्थ 'प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार' रयत शिक्षण संस्थेला प्रदान करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. हा पुरस्कार रयत शिक्षण संस्थेच्या वतीने चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी स्वीकारला. १ लाख ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. पाटील म्हणाले, कर्मवीरांनी शिक्षणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रयोग केले. या प्रयोगांमुळे समाजातल्या तळागाळातल्या, गोरगरीब, दलित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील होणे शक्य झाले. खेड्यापाड्यातल्या मातीतली रत्नं त्यांनी गोळा केली आणि त्यांच्या माध्यमातून समतेची रचना केली. रा.कृ. कणबरकर सरांनाही त्यांनी असेच बेळगावहून सातार्‍याला शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विभागप्रमुख म्हणून आणले. त्यांना कराडच्या संत गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्यही केले. अण्णांमुळे महाराष्ट्राचे व्यापक कार्यक्षेत्र कणबरकरांना लाभले आणि आपली लेखणी, वाणी बहुजनांच्या उद्धारासाठी वापरून त्यांनी नवी महाविद्यालये आणि विद्यार्थी घडविले. राजर्षी शाहू महाराजांविषयीचा जिव्हाळा हा आम्हा दोघांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा होता, असेही त्यांनी सांगितले.

पुरस्काराला उत्तर देताना रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेला पुरस्कार आमच्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे. कारण सन १९०२-०८ या कालावधीत अण्णा कोल्हापुरात जैन बोर्डिंगमध्ये शिक्षणासाठी राहिले होते. तर शेवटचे वर्ष त्यांना राजर्षी शाहू महाराजांबरोबर राजवाड्यात राहण्याची संधी मिळाली. महात्मा फुले, महात्मा गांधी आणि शाहू महाराज यांना त्यांनी गुरू मानले. आणि त्यांच्या विचारांना कृतीचे स्वरुप त्यांनी दिले. जागतिकीकरणातील बदलत्या परिस्थितीमध्ये रयत शिक्षण संस्था आपल्या ध्येयापासून तसूभरही ढळलेली नाही. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्य विकास, रोजगाराभिमुखता या गोष्टींना या नव-व्यवस्थेत मोठे महत्त्व आले आहे. त्या दृष्टीने शिक्षणक्रमात कालसुसंगत बदल करून विद्यार्थी घडविण्याला रयतचे प्राधान्य आहे. त्याचवेळी विना-अनुदानितसारखी कितीही संकटे आली तरी, आदिवासी, ग्रामीण भागापर्यंत शिक्षणाची गंगा नेण्याचे व्रत संस्था कधीही सोडणार नाही, याची ग्वाही त्यांनी या प्रसंगी दिली. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य बी.ए. खोत यांनी केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. अरुण कणबरकर यांनी कणबरकर कुटुंबियांतर्फे मान्यवरांचा सत्कार केला. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. एन. जे. पवार, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे, शालिनी कणबरकर, डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. भालबा विभुते यांच्यासह शिक्षक, महाविद्यालयांचे प्राचार्य, रयत शिक्षण संस्थेशी संबंधित शाळा, महाविद्यालयांचे शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**कोल्हापूर : 'प्राचार्य आर.के. कणबरकर पुरस्कार' कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेच्यावतीने स्वीकारताना चेअरमन डॉ. अनिल पाटील व माजी चेअरमन डॉ. एन.डी. पाटील. शेजारी डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. बी.ए. खोत.**

जनसंपर्क कक्ष
15 APR 2017 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. संभाजीराजे छत्रपती, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.

# लोकशाहीसाठी सहिष्णुता विवेकाची गरज : डॉ. जोंधळे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय लोकशाही आणि संविधान टिकवायचे असेल तर, विवेक, बुद्धीप्रामाण्यवाद आणि सहिष्णुता यांचा स्वर तीव्र करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी आज येथे केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रवाद आणि लोकशाहीसंबंधी विचार' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. खा. संभाजीराजे छत्रपती प्रमुख पाहुणे म्हणून, तर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला.

खा. संभाजीराजे यांनी राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्नेहसंबंधांचा मनोवेधक आढावा घेतला. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. भगवान माने यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी विकास संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

15 APR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सुरेंद्र जोंधळे : शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

# सहिष्णुतेचा स्वर तीव्र करणे गरजेचे

**कोल्हापूर :** बाबासाहेबांनी भारताला 'एक व्यक्ती, एक मूल्य' हे मानवतावादाचे महान तत्त्व प्रदान केले. त्यांना देशात स्वातंत्र्य, समता या मूल्यांइतकीच किंबहुना त्याहूनही अधिक बंधुता अर्थात भ्रातृभावाच्या प्रस्थापनेची नितांत गरज वाटत होती. भारतीय लोकशाही आणि संविधान टिकवायचे असेल तर विवेक, बुद्धिप्रामाण्यवाद आणि सहिष्णुता यांचा स्वर तीव्र करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी शुक्रवारी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर-यांचा राष्ट्रवाद आणि लोकशाहीसंबंधी विचार' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी खासदार संभाजीराजे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. जोंधळे म्हणाले, तळागाळातील लोकांना राजकीय प्रतिनिधित्व, सर्वांना नागरिकत्वाचे समान अधिकार, सर्वांना राजकीय सत्तेत समान वाटा आणि त्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ ही बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या लोकशाहीची ठळक वैशिष्ट्ये होती. सुयोग्य राजकीय लोकशाहीसाठी अस्पृश्य, वंचित समाजघटकांना सत्तेत समान वाटा देण्याबाबत ते आग्रही होते.

खासदार संभाजीराजे यांनी राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्नेहसंबंधांचा मनोवेधक आढावा घेतला. ते म्हणाले, माणगाव परिषदेमध्ये शाहू महाराजांनी बाबासाहेबांना ज्या विश्वासाने बहुजनांचे नेते म्हणून पुढे आणले होते, तो विश्वास त्यांनी सार्थ ठरविला. जातिआधारित विषमतावादाला मूठमाती देऊन जोपर्यंत या देशातील सर्व लोक एकाच पातळीवर येणार नाहीत, तोपर्यंत फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार आपण अमलात आणला, असे म्हणता येणार नाही.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, या देशातील लोकांच्या मनात एकता व एकात्मतेची भावना रुजविण्यासाठी बाबासाहेबांनी संविधानात 'आम्ही भारताचे लोक' अशी अत्यंत मनोवेधक रचना केली. स्वातंत्र्य, समता व बंधुता या शब्दांचा त्यांना अभिप्रेत अर्थ भारतीय समाजाला समजावून सांगण्यासाठी त्यांनी अविश्रांत धडपड केली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे असे अगणित दुर्लक्षित पैलू जगासमोर आणण्याची जबाबदारी आजच्या युवकांवर आहे.

डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. भगवान माने यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर विद्यार्थी विकास संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, माजी बी.सी.यू.डी. संचालक डॉ. डी. आर. मोरे, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित व्याख्यानात डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. विलास नांदवडेकर, खासदार संभाजीराजे, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## संविधानाच्या उद्देशिकेचे अनावरण

यावेळी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर राजर्षी शाहू सभागृहाच्या प्रांगणात प्रतिष्ठापित करण्यात आलेल्या भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे खासदार संभाजीराजे यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

15 APR 2017
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाबासाहेबांनी दिले मानवतावादाचे महान तत्त्व

## - डॉ. सुरेंद्र जोंधळे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारतीय लोकशाही आणि संविधान टिकवायचे असेल तर विवेक, बुद्धिप्रामाण्यवाद आणि सहिष्णुता यांचा स्वर तीव्र करण्याची आवश्यकता आहे. बाबासाहेबांनी भारताला 'एक व्यक्ती, एक मूल्य' हे मानवतावादाचे महान तत्त्व प्रदान केले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'डॉ. आंबेडकर यांचा राष्ट्रवाद आणि लोकशाहीसंबंधी विचार' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. खा. संभाजीराजे छत्रपती प्रमुख पाहुणे होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. जोंधळे म्हणाले, बाबासाहेबांना या देशामध्ये स्वातंत्र्य, समता या मूल्यांइतकेच किंबहुना त्याहूनही अधिक बंधुता अर्थात भ्रातृभावाच्या प्रस्थापनेची नितांत गरज वाटत होती. भारतीय समाजामधला भ्रातृभाव हरवलेला आहे. त्याची प्रस्थापना करून या तीन मूल्यांच्या आधारावर भारतीय समाजव्यवस्थेची फेररचना करण्याची गरज त्यांना वाटत होती.

खा. संभाजीराजे छत्रपती यांनी राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांच्या स्नेहसंबंधांचा मनोवेधक आढावा घेतला. ते म्हणाले, डॉ. आंबेडकरांना आपण ठराविक निकष लावून संकुचित बनवून ठेवले आहे. राजर्षी शाहू महाराजांसारख्या छत्रपतीला बाबासाहेबांना व्यक्तिशः जाऊन भेटण्याची इच्छा होते, त्यातूनच बाबासाहेबांचे मोठेपण खरे तर आपल्या लक्षात यायला हवे. या देशातील सर्व लोक एकाच पातळीवर येणार नाहीत, तोपर्यंत फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार आपण खऱ्या अर्थाने अमलात आणला असे म्हणता येणार नाही. या त्रयींच्या विचारांचा प्रसार तळागाळापर्यंत करणे आणि समता प्रस्थापित करणे हे माझे जीवित ध्येय असल्याचेही त्यांनी सांगितले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे अनावरण करताना खासदार संभाजीराजे छत्रपती. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. टी. गायकवाड, अजित चौगुले, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. सुरेंद्र जोंधळे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. भगवान माने, डॉ. वासंती रासम, डॉ. भारती पाटील.**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, या देशामधील सम्यक क्रांतीचे निर्विवाद नेते म्हणून मी नेहमीच बाबासाहेबांकडे पाहतो. देशातील लोकांच्या मनामध्ये रुजलेला 'मी'पणा समूळ उपटून टाकण्यासाठी आणि त्यांच्यात एकता व एकात्मतेची भावना रुजविण्यासाठी त्यांनी संविधानात 'आम्ही भारताचे लोक' अशी अत्यंत मनोवेधक रचना केली.

डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. भगवान माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले.

**संविधानाच्या उद्देशिकेचे अनावरण**

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. राजर्षी शाहू सभागृहाच्या प्रांगणात प्रतिष्ठापित करण्यात आलेल्या भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. डी. आर. मोरे, विविध विद्याशाखांचे अधिष्टाता, अधिविभागप्रमुख आदी उपस्थित होते.

15 APR 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाण्याची हमी दिल्याशिवाय समाज सक्षम होणार नाही : डॉ. एन. जे. पवार

**सेनापती कापशी : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत तीन तत्त्वांचा उल्लेख केलेला आहे. त्यामधील सामाजिक न्याय, राजकीय न्याय समाजाला मिळाला. परंतु, आर्थिक न्याय समाजाला मिळाला नाही. तो न्याय समाजाला देण्याची गरज आहे. घटनेत तरतूद असताना देखील समाज आर्थिकदृष्ट्या मागास राहिला. या वंचित समाजाला पाण्याची हमी दिल्याशिवाय समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.एन. जे. पवार यांनी केले.

तमनाकवाडा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त चिकोत्रा खोऱ्यातून आर्थिक न्याय प्रस्थापना संघर्ष यात्रा काढण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी समन्यायी पाणी वाटप प्रकल्पाचे प्रमुख आनंदराव पाटील होते. यावेळी निपाणीचे माजी आमदार काका पाटील यांचे भाषण झाले. यावेळी डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. लाभार्थी अपंगाना अपंग निधीचे चेक वाटप करण्यात आले. याप्रसंगी सरपंच दत्तात्रय चव्हाण, उपसरपंच सुलाबाई काबंळे, आर.बी.पाटील, अनिल काळे, कुशापराव पाटील, भिकाजी पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक दत्तात्रय चव्हाण यांनी केले. आभार मुख्याध्यापक विठ्ठल कांबळे यांनी केले.